**<u>नियमित दिवाणी दावा क्र.१/२००८</u>**
**<u>वादीतर्फे सा.क्र.१</u>**
**<u>निशाणी क्र.१७३ वर पुढे सुरु...</u>**

शपथेवर पुढे सुरु –
**<u>प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. ए. डी. निंबाळकर यांच्यामार्फत उलटतपासः</u>**

१०. न्यायालयाने मोजणी आदेश केल्यानंतर भुमि अभिलेख कार्यालयामध्ये रिट गेल्यानंतर मी तेथे गेलो होतो. भुमिअभिलेख कार्यालया मधून मला मागणी करण्यात आलेले सर्व कागदपत्र मी मोजणीकामी दिले होते. मोजणी कार्यालयातून मला ज्या कागदपत्रांची मला मागणी केली ते कागदपत्र मी दिले. हे म्हणणे खरे नाही की, सदर मोजणी करण्याकरीता माझ्यामते आवश्यक असणारे कागदपत्र मी त्यांना दिले नाही. सदर मोजणीकामी आवश्यक असलेली सर्व कागदपत्र मी भुमिअभिलेख कार्यालय, बाळापूर येथे दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर मोजणीकामी भुमिअभिलेख कार्यालयामधून मला तसेच दावा मिळकत जमीन लगत असणाऱ्या शेतकऱ्यांना व प्रतिवादी यांना नोटीस काढली होती. सदर मोजणी झाली त्यावेळी मी प्रत्यक्षात त्या ठिकाणी हजर होतो. हे म्हणणे खरे आहे की, मोजणी कार्यालयातून ज्या ज्या लोकांना नोटीस काढल्या होत्या ते सर्व लोक मोजणीकामी हजर होते, परंतु प्रतिवादी गैरहजर होता त्यांचा मुलगा त्या ठिकाणी हजर होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर मोजणी करतेवेळेस मी मोजणी करणाऱ्या अधिकाऱ्यास मला सदर मोजणीकामी ज्या ज्या गोष्टी आवश्यक वाटत होत्या त्या सर्व मी त्यांना सांगितल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रातील संपुर्ण मजकूर खोटा लिहीलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी यांनी खरेदीखताने जे शेत खरेदी केले होते ते क्षेत्र त्यांच्या ताब्यामध्ये आहे.

| | |
|---|---|
| **प्रश्न :** | सदर मोजणी केल्यानंतर तुमच्या ताब्यामध्ये ५९ आर क्षेत्र सापडले होते, हे खरे आहे काय ? |
| **उत्तरः** | सदर मोजणीदरम्यान मोजणी अधिकारी यांनी आम्हाला कोणत्याही खुणा करुन दिल्या नव्हत्या तसेच प्रतिवादीच्या ताब्यामध्ये आमचे क्षेत्र आहे. |

११. हे म्हणणे खरे नाही की, सदर मोजणीदरम्यान मोजणी अधिकारी यांनी आम्हाला कोणत्याही खुणा करुन दिल्या नव्हत्या तसेच माझे क्षेत्र हे प्रतिवादीच्या ताब्यात

आहे, हे मी खोटे सांगत आहे. नंदा भास्कर जगताप ही माझी पत्नी आहे. गट क्र.६३१ मध्ये माझ्या पत्नीच्या नावे ४३ आर क्षेत्र आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या नावे असलेले क्षेत्र व माझ्या पत्नीच्या नावे असलेले क्षेत्र हे मोजणीमध्ये एकत्र दाखविले आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी च्या गट क्र.६३१ ची जमीन हडप करण्याच्या उद्देशाने सदरचा दावा दाखल केला व खोटा पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– १९.०९.२०२५**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE

Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2025.09.19 17:03:52 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**बाळापूर**

प्रमाणपत्र

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. डी. एम. वाघमारे,** सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | १९/०९/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | १९/०९/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | १९/०९/२०२५ |